# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

## आस्थापना शाखा -३

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३५६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५ E-mail-estt3.pco.pune@nic.in


क्र.आस्था-३(१)/पो.भ.-२०१८/बँडस्मन भरती/२०१८, पुणे, दि. ०५/०४/२०१८.

## पोलीस भरती-२०१८ मध्ये बँडस्मन पदासाठी आवेदन अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना

बँडस्मन पदासाठी अर्ज केलेले व मैदानी चाचणी मध्ये ५० व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी बँडस्मनच्या रिक्त पदांच्या संख्येनुसार १:१५ प्रमाणांत लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी पुणे शहर पोलीस घटकाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आली आहे.

सदर यादीनुसार लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षेपुर्वी "वाद्यांची माहिती व वाद्य वाजविण्याची प्रात्यक्षिक परीक्षा" दिनांक ०९/०४/२०१८ व १०/४/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वा.शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पुणे येथे घेतली जाणार आहे. तरी, बँडस्मन उमेदवारांनी त्यांना प्रात्यक्षिक परीक्षेस नेमुन दिलेल्या तारखेस व वेळी, मैदानी चाचणीचे वेळी दिलेल्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.

**बँडस्मन पदाचे उमेदवारांचे निवडी विहीत केलेले अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

१) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम,२०११ मधील नियम ३(२)(ब)(अ)(क) नुसार **"बँडपथकातील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील"** अशी अनुभव व इतर अट विहीत करण्यांत आलेली आहे.

२) अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.अपोमसं/पोशि.भरती/सन २०१८/ ५०१/२०१७/५५९,दि.०३/०२/२०१८ व क्र.अपोमसं/पोशि.भरती/सन २०१८/ ५०१/२०१७/१३७९, दि.१८/०३/२०१८ नुसार बँडस्मन पदासाठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मैदानी चाचणी मध्ये ५०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी बँडस्मनच्या रिक्त पदांच्या संख्येनुसार १:१५ या प्रमाणांत पात्र ठरणा-या उमेदवारांची ३० गुणांची "वाद्यांची माहिती व वाद्य वाजविण्याची प्रात्यक्षिक परीक्षा" बँडस्मन पोलीस भरती-२०१८ समिती मार्फत घेण्यांत येईल.

३) तसेच प्रात्यक्षिक परीक्षा पुर्ण झाल्यानंतर बँडस्मन पदाच्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल. सदर लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांपैकी ७०% गुणांच्या प्रमाणात विचारात घेण्यांत येऊन, त्यानुसार लेखी परीक्षेत प्राप्त झालेले गुण व प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये ३० गुणांपैकी प्राप्त झालेले गुण यांची बेरीज करुन, येणारी संख्या ही उमेदवारांस लेखी परीक्षेमध्ये १०० गुणांपैकी मिळालेले गुण म्हणून विचारात घेण्यांत येतील.

४) बँडस्मन पदाची गुणवत्ता यादी २०० (शारिरीक/मैदानी चाचणी १०० गुण + लेखी + प्रात्यक्षिक परीक्षा-१०० गुण ) गुणांपैकी मिळालेल्या गुणांनुसार, निवडसूची तयार करण्यासाठीच्या विविध शासन / परिपत्रकांमधील तरतुदी विचारात घेऊन तयार करण्यांत येईल.

५) पोलीस बँडस्मन पथकातील उमेदवार निवडीसाठी घेण्यात येणा-या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी गठीत करण्यांत आलेल्या समिती मध्ये भारतीय सैन्य दलाती सेवानिवृत्त बँडस्मन अधिकारी/पोलीस दलातील सेवानिवृत्त अधिकारी यांचा समावेश आहे.

**पोलीस भरती समिती-२०१८**
**यांचे मान्यतेने.**

( साहेबराव पाटील )
अध्यक्ष,पो.भ.समिती-२०१८ तथा
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर

## गुणवत्ता यादीतील अ.नं. १ ते ८० उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख खालील प्रमाणे

**एस.एम.एस. (बल्क मेसेज)**

बँडस्मन मैदानी चाचणीचे गुणांच्या आधारे १:१५ प्रमाणांत आपली लेखी परीक्षेसाठीच्या गुणवत्ता यादीत निवड झालेली असून, लेखी परीक्षेपुर्वी **"वाद्यांची माहिती व वाद्य वाजविण्याची प्रात्यक्षिक परीक्षा" दिनांक ०९/०४/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वा. शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पुणे येथे घेतली जाणार आहे. तरी, आपण मैदानी चाचणीचे वेळी दिलेल्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.**

**अध्यक्ष,पोलीस भरती समिती-२०१८ तथा**
**अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर**

.

( साहेबराव पाटील )
अध्यक्ष,पो.भ.समिती-२०१८ तथा
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर

**गुणवत्ता यादीतील अ.नं. ८१ ते १५६ उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख खालील प्रमाणे**

**एस.एम.एस. (बल्क मेसेज)**

बँडस्मन मैदानी चाचणीचे गुणांच्या आधारे १:१५ प्रमाणांत आपली लेखी परीक्षेसाठीच्या गुणवत्ता यादीत निवड झालेली असून, लेखी परीक्षेपुर्वी **"वाद्यांची माहिती व वाद्य वाजविण्याची प्रात्यक्षिक परीक्षा" दिनांक १०/०४/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वा. शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पुणे येथे घेतली जाणार आहे. तरी, आपण मैदानी चाचणीचे वेळी दिलेल्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.**

**अध्यक्ष,पोलीस भरती समिती-२०१८ तथा**
**अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर**

.

( साहेबराव पाटील )
अध्यक्ष,पो.भ.समिती-२०१८ तथा
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर